MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

- भाजपाचे राजेंद्र मस्केची जिल्हाध्यक्ष पदाची धुरा ही काढली विश्वसनीय सूत्रांची माहिती?
- राजेंद्र मस्के यांची भूमिका तळ्यात मळ्यात?
- राजेंद्र मस्केची परिस्थिती म्हणजे घरकाना घाटका? भाजप पदाधिकाऱ्यांचा राजेंद्र मस्केला विरोध?
- राजाचा बैलगाडा फसला ना जरांगे पाटील ना पंकजाताई ना भाजपचा एकही पदाधिकारी फिरकला नाही.
- अपक्ष लढायचं म्हणजे बैलगाडा शर्यत बघायला आलेले लोक मतदान करतील का राजेंद्र मस्के ला पडलेला प्रश्न?
- दोन वर्षांपूर्वी बैलगाडा शर्यती मधील बक्षीस राजेंद्र मस्के ने का दिली नाहीत. असाही प्रश्न त्यावेळी बघ्याच्या भूमिकेमध्ये असलेल्या लोकांच्या मनात व ओठावर?
- बीड जिल्हा भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये राजेंद्र मस्केच्या विषयी मोठी संतापाची लाट या ज्या बॅनरवर मनोज जरांगे यांचा फोटो आहे त्या बॅनरवर पंकजाताईंचा फोटो नाही आणि पंकजाताईंचा फोटो ज्या बॅनर वर आहे त्या बॅनर वर मनोज जरा गेम चा फोटो नाही.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१३ | सोमवार दि.३० सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -13 | MONDAY DT.30 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सर्जा राजाची स्पर्धा घेणारा बीडचा राजा बीड विधानसभेच्या स्पर्धेतून बाहेरच?





## आता राजेंद्र मस्केला जिल्हा परिषदला ही मुकावा लागणार आमदारकी तर लांबच भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये चर्चेला उदान? पंकजाताई प्रीतम ताई समर्थक आणि मनोज जरांगे पाटील समर्थकांनी राजेंद्र मस्केच्या बैलगाडा शर्यतच्या कार्यक्रमाकडे फिरवली पाठ? राजेंद्र मस्के ने सुद्धा पंकजा मुंडेना विरोध करतचं मतदान केलं कारण राजेंद्र मस्केला मराठा समाजाच्या मतदार बंधू-भगिनी जागेवर उभा केलं नाहीह चालता व्हा असा मराठा समाजाने राजेंद्र मस्केला शब्द खडे बोल चुनावले आहेत.?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये २०२४ मध्ये पंकजा मुंडे यांचा पराभव घ्या थोड्या मताने झालेला आहे यामध्ये अनेकांनी पंकजा मुंडे यांना जवळ राहून धोका दिलेला आहे. खंदे समर्थक म्हणून ओळखले जाणारे भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी या अगोदर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. परंतु त्या ठिकाणी राजेंद्र मस्के यांनी तो बैलगाडा शर्यत रद्द करत त्यावेळेस ठेवलेले बक्षीस कोणालाही दिले नाही. व स्वतःचे हित जपले परंतु २०२४ मध्ये पंकजा मुंडे यांचा पराभव झाल्याच्या नंतर राजेंद्र मस्के यांनी एक बैलगाडा शर्यत आयोजन केले होते काल २९ रोजी सप्टेंबर रोजी २०२४ ला बैलगाडा शर्यत ही मोठ्या उत्साहात बीड जिल्ह्यातील जनतेने पहिली खरी परंतु या बैलगाडा शर्यतीतून राजेंद्र मस्के यांनी मी अपक्ष लढणार अशी घोषणा केली आहे. परंतु अपक्ष लढत असताना राजेंद्र मस्केलांना भाजपच्या पदाधिकाऱ्यांना पंकजा मुंडे यांचा सपोर्ट असणार किंवा सहकारी असणार नाही यात तीळ मात्र शंका आहे. पंकजा मुंडे यांनी हात दाखवला आहे तरी राजेंद्र मस्के यांनी आता मनोज जारंगे पाटील यांचे बीड जिल्ह्यामध्ये बॅनर लावलेले आहेत. तर मनोज रंगे पाटील यांचा ज्या बॅनर फोटो आहे त्या बॅनर पंकजा मुंडे यांचा फोटो नाही आणि ज्या बॅनर वरती पंकजा मुंडे यांचा फोटो आहे त्या बॅनर वरती मनोज जरांगे पाटील यांचा फोटो नसल्यामुळे राजेंद्र मस्के यांची परिस्थिती म्हणजे घरकांना घाटका झालेली आहे. राजा मस्केचा बैलगाडा फसला अशी चर्चा मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे तर राजेंद्र मस्के यांनी सर्जा राजाची बैलगाडी शर्यतीची जरी आयोजन केले असले तरी राजेंद्र मस्के हा आता बीड विधानसभेतून स्पर्धेच्या बाहेर पडलेल्या उमेदवार आहे. अशी चर्चा होत आहे. राजेंद्र मस्के यांना आता मराठा समाजाची साथ राहिलेली नाही तर ओबीसीची ही साथ राहिलेली नाही राजेंद्र मस्के ची तळ्यामळ्यातील भूमिकेमुळे राजेंद्र मस्के आता व त्यात आलेले आहेत. त्यांच्या या कालच्या बैलगाडा शर्यती वरती पंकजा मुंडे व मनोज जरागे पाटील यांच्या फोटोमुळे राजेंद्र मस्के विषयी संताप व्यक्त होत. असतानाच मराठा समाजाचे म्हणणं आहे की पंकजा मुंडे यांना सोडून जर राजेंद्र मस्के यांनी डायरेक्ट मनोज जारंगे पाटील यांचा फोटो वापरून जर कार्यक्रम घेतला असता तर यापेक्षाही जास्त गर्दी झाली असती व राजेंद्र मस्केचे आमदार किंवा झाले असते परंतु राजेंद्र मस्के जवळ अठरापगड जातील कार्यकर्ते दुखावण्याचा प्रयत्न झालेला आहे. राजेंद्र मस्के यांना यावेळी आता बीडच्या आमदारकीच्या स्पर्धेतून मराठा समाजाने बाहेर काढल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे?










# वंचित बहुजन आघाडी (पूर्व) ची अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृह येथे महत्वपूर्ण बैठक संपन्न

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर यांच्या आदेशाने जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण बैठक आंबेजोगाई येथे आयोजित केली होती त्या बैठकीत महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली या बैठकीच आयोजन वंचित बहुजन आघाडी पूर्वचे जिल्हाध्यक्ष शैलेश भाऊ कांबळे यांनी केले होते या बैठकीस उपस्थित जिल्ह्यातील पाच तालुक्यातील तालुकाध्यक्ष व महासचिव तसेच जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार का निवडून द्यायचा या महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली एससी आणि एसटीचे आरक्षण धोक्यात आहे, जर एससी एसटीला नॉन क्रिमिनल लागू झाले तरी इथून पुढील पिढी शिक्षणापासून वंचित राहील नॉन क्रिमिनल लागू होणे म्हणजे एका कुटुंबात एकाच सदस्याला लाभ प्राप्त झाल्यास तो दुसऱ्याला घेता येणार नाही.भाजप आणि काँग्रेस एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत,जर आरक्षण टिकवायचे असेल तर जइउ चे १०० आमदार आणि डउ,डढ चे ४५ आमदार निवडून आणणे गरजेचे आहे.केज ,माजलगाव, परळी या मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार जास्तीत



जास्त मतांनी निवडून येतील असे बैठकीत सांगण्यात आले. प्रत्येक तालुक्यात जइउआरक्षण बचाव यात्रा काढण्यात यावी, शहरी भागात डउ, डढ जइउ प्रभागात बैठकी घेण्यात याव्यात या बैठकीत उपस्थित वंचित बहुजन आघाडी पूर्वचे जिल्हाध्यक्ष शैलेश भाऊ कांबळे ,जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, महासचिव धम्मानंद कासारे, खाजमिया पठाण,गोविंद मस्के शहराध्यक्ष अंबाजोगाई, लिंबराज बापू गायकवाड धारूर तालुका अध्यक्ष प्रशांत उघडे, महासचिव रानबा उजगरे, केज तालुका अध्यक्ष बाबासाहेब मस्के ,जिल्हा उपाध्यक्ष धनराज सोनवणे,केज तालुका प्रवक्ता प्रदीप गायकवाड व सुशांत धावारे ,भारत गायकवाड ,रवी शिरसट ,सुशांत सोनवणे, हरिभाऊ कांबळे ,राहुल राऊत, प्रेम जगतकर,शरद धिवर तसेच वंचित बहुजन आघाडी पूर्वचे जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# दोन ऑक्टोबर रोजी होणारी निर्णायक बैठक स्थगित - आ. लक्ष्मण पवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार लक्ष्मण पवार यांनी विधानसभा निवडणूक लढणार नाही, अशी घोषणा केली होती. त्यानंतर मतदारसंघांतील कार्यकर्ते, मित्र परिवार, समर्थकांनी आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवावी यासाठी त्यांच्या घरासमोर आंदोलन करून आग्रह केला होता. त्यानंतर मला विचार करण्यासाठी काही वेळ द्या, असा १५ दिवसाचा वेळ घेतला होता. पण काही कारणास्तव दि.२ ऑक्टोबर रोजी होणारी निर्णायक बैठक स्थगित केली आहे.

कार्यकर्ते मित्र परिवार तसेच समर्थक मी विधानसभा निवडणुक लढवावी म्हणून आग्रह केलेला आहे. तरी मला विचार करण्यासाठी काही वेळ द्या, असे मी सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना सांगितले होते. त्या अनुषंगानेच आपण २ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्याचे ठरले होते. पण काही कारणास्तव ही निर्णायक बैठक स्थगित करण्यात येऊन नवीन तारीख लवकरच कळविण्यात येईल असे आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे. दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की, २ ऑक्टोंबर रोजी होणारी बैठक सध्या स्थगित करण्यात आली आहे. तरी पुढील



तारीख लवकरच कळविण्यात येईल असे आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.

## बीड शहरातील अस्वच्छता, गटारीचे पाणी रस्त्यावर, रस्त्यावरील खड्डे, मोकाट जनावरे

# निष्क्रिय नगरपरिषद प्रशासनाच्या निषेधार्थ लक्ष्यवेधी गोट्या खेळा आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड : बीड शहरातील रस्त्यांवर जागोजागी कच-यांचे ढीग, पावसाळ्यात गटारीचे पाणी रस्त्यावर, अर्धवट नाल्यांची कामे,शहरात पसरलेली दुर्गंधी त्यामुळे पसरणारे साथीचे रोग, बीड शहरातील मान्सुनपुर्व स्वच्छता कामे कागदोपत्रीच करण्यात आली असुन शहरातील शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर त्यामुळे होणारे अपघात तसेच मोकाट कुत्र्यांचा चावा त्यामुळे नागरीकांचे जीव धोक्यात आदी मुलभूत प्रश्नांसाठी वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्यात कसूर करत कामांकडे दुर्लक्ष करत असुन नगरपरिषद प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे




लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.३० सोमवार रोजी नगरपरिषद कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड यांच्या दालनासमोर गटारीचे पाणी रस्त्यावर,' रस्त्यावर खड्डे ' नगरपरिषद प्रशासन काय करतंय गोट्या खेळतंय अशी घोषणाबाजी करत गोट्या खेळुन

लक्ष्यवेधी गोट्या खेळो आंदोलन करण्यात आले.नीता अधारे मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार ,रामधन जमाले इंटक जिल्हाध्यक्ष बीड, आपचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद आदि सहभागी होते.

# सिरसाळा झाले घाणीचे मोठे शहर लोकप्रतिनिचे दुर्लक्ष

सिरसाळा ।बापू किरवले

दिनांक ३०. परळी तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असणारी शिरसाळा हे घाणीचे साम्राज्य बनले आहे व तेथील लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत सदस्य आपापल्या कामांमध्ये व्यस्त झाले आहेत त्यांना जनतेचा काही प्रश्नाविषयी व घाणीचे अर्थार्थी काही संबंध राहिलेला नाही व या घाणीमुळे रोगराई पसरण्याची सर्वात मोठी भीती सामान्य जनतेसमोर पडली आहे तरी लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायत कार्यालय शिरसाळा यांनी लक्ष देऊन या घाणीचे विल्हेवाट करण्यात यावी अशा सूचना सामान्य जनतेमधून करण्यात येत आहे शिरसाळा तालुक्यातील मोठा बाजारपेठ भरत असल्यामुळे या गावी घाणीचे प्रमाण जास्त होत आहे व विद्युत पुरवठासह घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी याची विल्हेवाट करण्यात यावी व व्यापाऱ्यासह बाजारपेठेत संवेदनशील समस्या येथील नागरिकाची नेहमीच डोकेदुखी ठरली आहे याकडे ग्रामपंचायत सह लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे शिरसाळा येथील महावितरण कंपनी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात वारंवार अपयशी




ठरत आहे तेथील नागरिकांना नाहक त्रास होत आहे बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांना लघु संख्येची प्रश्न चर्चेत आला आहे त्यामुळे शिरसाळा महावितरण कार्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र लघु पाटबंधारे कार्यालय व जुने बस स्थानक व शासकीय गोदाम पशुवैद्यकीय दवाखाना व शिरसाळा पोलीस स्टेशन व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक महाराष्ट्र ग्रामीण बँक जिल्हा मध्यवर्ती बँक या ठिकाणी सर्वजनिक शौचालय असणे गरजेचे आहे स्थानिक प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्वच्छालय बांधावे अथवा रेडिमेट स्वच्छतेची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे व बाजारपेठेतील व्यापारी वर्ग व्यवसायिकांमधून होत आहे याकरिता संबंधित लोकप्रतिनिधी यांनी यावर लक्ष करावे व जनसामान्य लोकांची गैर्य सोय होऊ देऊ नये याची काळजी घ्यावी ही विनंती करण्यात येत आहे

# गेवराई विधानसभा मतदारसंघात वैचारिक परिवर्तन घडविण्यासाठी सप्ताहाचे आयोजन - ॲड. संजय काळे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघात वैचारिक परिवर्तन घडविण्यासाठी वैचारिक परिवर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती गेवराई तालुका वैचारिक परिवर्तन संघाचे अध्यक्ष ड. संजय भाऊ काळे यांनी दिली आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात परिवर्तन घडविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते व सुजाण नागरिकांनी सध्याच्या परिस्थितीत पुढे येण्याचे कळकळीचे व नम्र आवाहन वैचारिक परिवर्तन संघाचे तालुकाध्यक्ष ड. संजय भाऊ काळे यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला परिवर्तनवादी विचाराच्या लोकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. ड. संजय भाऊ काळे यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील विकास, नियोजन, नागरिकांच्या अडी-अडचणी आणि सामाजिक कार्यकर्त्यांची सार्वजनिक जबाबदारी याची जाणीव करून देण्यासाठी विचारविनिमय व चर्चा करण्यासाठी प्रत्यक्ष बैठका व सोशल मीडियाद्वारे सुसंवाद साधण्यासाठी गेवराई येथील जालना रोडवरील जुन्या बस स्टॅन्ड शेजारील वैचारिक परिवर्तन संघाच्या कार्यालयात दि.२८ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत वैचारिक परिवर्तन सप्ताहाचे आयोजन केले असून, ड. संजय भाऊ काळे स्वतः सर्वांशी चर्चा करून सुसंवाद साधत आहेत. पहिल्याच दिवशी समाजातील पत्रकार, डॉक्टर्स, वकील, इंजिनियर्स, उद्योजक, व्यापारी विविध पक्ष, संस्था, संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक राजकीय कार्यकर्ते प्रतिष्ठित नागरिक आदींनी या चर्चेत सहभाग घेतला. या वेळेस गेवराई विधानसभा मतदारसंघात जनतेच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन कोणाच्याही भावनिक दबावाखाली न येता, सामाजिक व राजकीय चूक होऊ देऊ नये, असे मत यावेळी सर्वांनी व्यक्त केले. मतदार संघात परिवर्तन घडविण्यासाठी लवकरच जनजगृती समिती स्थापन करण्यात येणार असून त्यासाठी सर्वांनी पुढे



यावे, असे कळकळीचे व नम्र आवाहन गेवराई तालुका वैचारिक परिवर्तन संघाचे अध्यक्ष ड. संजय भाऊ काळे यांनी केले आहे. दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराई विधानसभा मतदारसंघात वैचारिक परिवर्तन घडविण्यासाठी वैचारिक परिवर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. असे ड. संजय भाऊ काळे यांनी सांगितले.






# खरीप २०२३ हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्याचे मंडळ कृषी अधिकारी मादळमोही यांचे आव्हान

प्रतिनिधी / मादळमोही

मा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री बाबासाहेब जेजुरकर व तालुका कृषि अधिकारी श्री अभय कुमार वडकुते यांच्या मार्गदर्शनाखाली खरीप २०२३ हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी खातेदारांनी ई-केवायसी करणे आवश्यक आहे, ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केले नाही त्यांनी नजिकच्या सीएससी सेंटर वर जाऊन ई-केवायसी करावे असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई-पिक पाहणी पोर्टलवरील नोंदणीकृत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी क्षेत्रानुसार प्रती हेक्टर रु.५,००० (२ हेक्टरच्या मर्यादित) अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. अर्थसहाय्य हे खातेदारांच्या आधार संलग्न बैंक खात्यात डीबीटीच्या माध्यमातून जमा करण्यात येणार आहे. त्यासाठी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. यापैकी या पोर्टलवर खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. ज्या शेतकऱ्यांचे ई-केवायसी करावयाचे आहे, त्यांची यादी गावात प्रदर्शित करण्यात आलेली आहे. शेतकरी स्वतः सुद्धा या पोर्टलवर जाऊन ओटीपीच्या माध्यमातून किंवा बायोमॅट्रीकच्या माध्यमातून सेवा सुविधा केंद्रात सीएसी वर जावून सुद्धा ई-केवायसी करू शकतात. याकरिता पोर्टलच्या मुख्य पानावर डिस्बसमेंट स्टेट्स) येथे क्लिक केल्यानंतर

शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक टाकावा. नंतर मोबाईलवर प्राप्त ओटीपी किंवा सीएसी केंद्रातील बायोमॅट्रीक मशिनच्या माध्यमातून ते ई-केवायसी पूर्ण करु शकतात. तरी शेतकऱ्यांनी तात्काळ ई-केवायसी करुन घ्यावे, असे आवाहन कृषि विभागामार्फत मंडळ कृषी अधिकारी राजेंद्र सांगळे कृषी पर्यवेक्षक संदीप देशमुख कृषी सहाय्यक एम आय शेख,बी आर मोहोळकर ,व्ही बी सानप,आर के मेहेत्रे ,श्वेता शेंडे, वंदना शिंदे ,एस व्ही पारखे,यांच्या तर्फे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजिकच्या मंडळ कृषी अधिकारी मादळमोही कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# होम मिनिस्टर कार्यक्रमास बाराव्या दिवशीही महिलांचा प्रचंड उत्साह कायम

## धांडे गल्लीतील रस्ता महिलांच्या सहभागाने फुलून गेला

बीड । प्रतिनिधी

गेल्या १२ दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची लोकप्रियतेची महिलांमध्ये क्रेझ निर्माण झाली आहे. पैठणी जिंकण्यापेक्षा चार भिंतीच्या आतील जीवन काही क्षण स्वतःच्या आनंदासाठी, दसऱ्याच्या घर कामाच्या व्यस्ततेतुनही या कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी महिला दिवसेंदिवस या कार्यक्रमास प्रचंड उत्साहाने सहभागी होत आहेत.हिरीरीने सहभागी होत आहेत. धांडे गल्ली प्रभाग क्रमांक १४ धांडे गल्ली चौक या ठिकाणी आज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या कार्यक्रमाची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे.हजारोच्या संख्येने महिला या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रतिभा विनोद धांडे, सौ.शकुंतला बद्रीनाथ शिंदे,सौ.यमुना लक्ष्मण सुस्कर,सौ.वर्षा लहू बागलाने,सौ.स्वाती सदाशिव धांडे,महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ. जयश्रीताई विधाते,माजी सभापती सौ.उषाताई सरवदे,सौ.प्रेमलताताई चांदणे,सौ.किर्तीताई पांगारकर-साळुंके,सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर, डॉ सौ.अंजलीताई पांगारकर,सौ.शारदा डुलघज सौ. संजीवनी ताई पौळ सौ. सिंधुताई पौळ,सौ.गीता ताई जयंत वाघ,सौ.डोंगर ताई आदी मान्यवर महिलांची उपस्थितीत पारपडले.होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे १८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या कार्यक्रमाने दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे.लोकप्रिय होत आहे.याचे सर्व श्रेय काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित आणि माजीमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर महिला आघाडी विचारमंच यांच्या सूत्रबद्ध नियोजनातून ही स्पर्धा दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे.

या कार्यक्रत भाग्यवान मानाच्या पैठणीची विजेती सौ.राजश्री अविनाश पिंगळे द्वितीय इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी विजेत्यां वाघोले तर तृतीय विजेत्या चौरंगाच्या मानकरी सौ.अर्चना सुरेश गिराम.या ठरल्या आहेत.तर उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.यामध्ये सौ.सुवर्णा नागनाथ धांडे,सौ.स्वाती सतीश गायकवाड,सौ.वर्षा लहू बागलाने,सौ.श्रद्धा धर्मेश पिंगळे,सौ.शोभा विकास मुळे,सौ.सोनाल विकास साळवे,सौ सपना गणेश धर्माधिकारी या मानकरी ठरल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.विजेत्या सर्व महिलांची ७ ऑक्टोबर रोजी बीएच.एम.एस.कॉलेज येथे होणाऱ्या खेळ पैठणीचा महाराष्ट्रातील प्रसिद्ध क्रांती नाना माळेगावकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे,यासाठी सर्व महिलांची निवड झाली आहे.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचाचे सर्व नगरसेवक कार्यकर्ते यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन निवेदक सुरेश साळुंकेंनी केले,या कार्यक्रमास महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

# खुंटेफळ तलावा साठी आणखी चार टीएमसी तर पाटोदा शिरूर साठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार

## निर्धार बैठकीत माजीमंत्री सुरेश धस यांचे प्रतिपादन
## कार्यकर्त्यांच्या बैठकीत सुरेश धस यांना आमदार करण्याचा निर्धार

आष्टी (सुरेश कांबळे)

सिना मेहकरी उपसा सिंचन खुंटेफळ साठवण तलाव असेल या योजना आणि या योजनेचे मी काम केले आहे.मात्र काहींनी बटन दाबण्याचे काम केलं आणि श्रेय घेण्याचं काम केलं सीना मेहकरी उपसा सिचन योजनेचे काम मी ९७% असून खुंटेफळ साठवण तलावा मध्ये १.६८ टीएमसी पाणी येणार आहे मात्र एवढ्यावर समाधान होणार नसून आणखी चार टीएमसी पाणी आणेपर्यंत पर्यंत मी शांत बसणार नाही तसेच पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी प्रतिपादन केले आहे.

आष्टी येथील लक्ष्मी लॉन्स येथील कार्यकर्त्यांच्या निर्धार बैठकीत ते बोलत होते. पुढे बोलताना माजी राज्यमंत्री सुरेश धस म्हणाले की,सध्या विधानसभा निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या असून आष्टीतील आजी माजी आमदारांनी मतदारसंघात दौरे सुरू केले आहेत मात्र यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये विकासाचे काय दिवे लावले ? गेल्या दहा वर्षांमध्ये आष्टी तालुक्यामध्ये किती शाळा खोल्या बांधल्या? अनेक ठिकाणी शिक्षकांची रिक्त पदे आहेत. तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या बैठका किती दिवसापासून घेतल्या नाहीत ? याचे उत्तर देण्याचे आव्हान माजी मंत्री सुरेश धस यांनी दिले... पुढे बोलताना म्हणाले की, गेल्या दहा वर्षापासून मी या मतदारसंघाचा आमदार नाही.तरीही लोकांना व कार्यकर्त्यांना अजून मीच आमदार असल्यासारखे वाटत आहे. आष्टी मध्ये सध्या आजी-माजी आमदारांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौरे सुरू केले आहेत .मात्र या दौऱ्यामध्ये त्यांनी दहा वर्षांमध्ये काय विकास केला ? हे सांगावे. आष्टी तालुक्यामध्ये किती शाळा खोल्या मंजूर केल्या ?. संजय गांधी निराधार योजनेच्या किती महिन्यापासून बैठकाच नाहीत त्यामुळे अनेक लाभार्थी वंचित राहिले आहेत.अनेक ठिकाणी शिक्षक नसल्याने पालक वर्ग रस्त्यावर उतरला आहे. अशीच अवस्था तालुक्यातील अनेक शाळांची झालेली आहे अधिकाऱ्यावर नियंत्रण नसल्याने साध्या वारसाच्या नोंदी लावण्यासाठी शेतकऱ्यांकडून दहा-दहा हजार रुपये घेतले जात आहेत याचे उत्तर जनतेला मिळाले पाहिजे असे प्रतिपादन सुरेश धस यांनी केले.

कोरोनाच्या काळामध्ये विरोधक घरामध्ये बसलेले असताना मी मात्र वर्षभर माझ्या घरापासून व माझ्या कुटुंबापासून दूर राहून लोकांना



वाचविण्याचे काम केले. मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या माध्यमातून तेरा ठिकाणी हॉस्पिटल तर ३३ ठिकाणी कोविड सेंटर उभारून लोकांना जीवदान देण्याचे काम केले. विरोधकांनी तर फक्त मोठं मोठ्या निबार शेवग्याच्या शेंगा वाटल्या. त्याही लोकांनी फेकून दिल्याची उपरोधिक टीका सुरेश धस यांनी केली. मी शेकडो रेमडिसिवर इंजेक्शन वाटले. मात्र फोटो कधीही काढला नाही. मात्र विरोधकांनी एक रेमडिसवर इंजेक्शन वाटून फोटोचा सिलसिला सुरू केला होता. माझी आई आजारी असताना सुद्धा मी वर्षभर लोकांमध्ये फिरून कोरोनाच्या रुग्णांना जीवदान देण्याचे काम केले. आष्टी मध्ये फक्त सिमेंट वाळू व पेव्हर ब्लॉगचा विकास झाला असून तेही त्यांच्याच माध्यमातून झाल्याचा आरोप त्यांनी केला.मी सीनामेहकरी योजनेचे काम ९७% केले मात्र तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येऊन त्या योजनेचे बटन दाबले व भीमराव धोंडे या योजनेचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत असल्याची टीका नाव न घेता त्यांनी केली. या खुंटेफळ योजनेमध्ये १.६८ टीएमसी पाणी येणार आहे मात्र एवढ्यावर समाधान होणार नसून आणखी चार टीएमसी पाणी आणेपर्यंत पर्यंत मी शांत बसणार नाही तसेच पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. सन २०१२ साली मी मंत्री असताना फळबाग योजनेसाठी जो जीआर काढला त्या योजनेचे फायदे आत्ता शेतकऱ्यांना मिळत असून फळबागामुळे तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी आता सुखी झाला आहे मी मतदार संघात जे काम केले त्याचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदे झालेले आहेत .जे काही कमावलेला आहे ते अत्यंत जुजबी आहे मी जे कमवले ती माझी ही प्रेमाची माणस आहेत आणि तीच माझी खरी संपत्ती आहे. लोकांच्या सुखदुःखात जावं लागतं लोकांच्या अडीअडचणी सोडाव्या लागतात लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडावे लागते त्याशिवाय जनमानसात स्थान मिळत नसतं.माझं कुटुंब हे सर्व लोकांच्या सुखदुःखात २४ तास असतं मतदारसंघात कुठेही काही घटना घडली तर ती माझ्या सर्वप्रथम कुटुंब यांना कळते यातच सगळं आलं.

आज अनेकांचे इच्छुकांचे भावींचे गावभेट दौरे सुरू आहेत आणि त्यांच्या दौऱ्याला प्रतिसाद भेटत नाही म्हणून संस्थाचालकांनी आपल्या मास्तरांच्या गाड्या लावल्यात तर काहींनी मतदारसंघातली पुढारी गोळा केलेत आणि ते दौऱ्यात सामील करून घेतलेत मला मात्र ही गोष्ट करायची कधीच आवश्यकता पडली नाही. कारण जिथे जाईल तिथे माझ्या अवतीभवती माणसा जमा होतात हीच माझी खरी संपत्ती आहे. कायम सर्व सामान्यांच्या प्रश्नांची योग्य मांडणी विधानसभेत वेळोवेळी केली कारण ज्याला ग्रामीण भागातली जाण असते आणि जो त्यांचे प्रश्न खंबीर नेत्या मांडतो त्याच्याकडेच नेतृत्व दिले जातात आणि म्हणूनच मला विश्वास आहे ही माझी जनता मला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहणार आहे त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत कितीही समोर येऊन द्या त्यांना एकटा बास. सिना मेहकरी उपसा सिंचन खुंटेफळ साठवण तलाव असेल या योजना आणि या योजनेचे मी काम केले आहे.मात्र काहींनी बटन दाबण्याचे काम केलं आणि श्रेय घेण्याचं काम केलं परंतु ज्या वेळेस या योजना राबवायच्या होत्या आणि मंजूर करून घ्यायच्या होत्या त्यावेळेस मात्र याच लोकांनी विरोध केला होता. आणि ही योजना कशी खोटी आहे हे सांगायचा प्रयत्न केला होता. परंतु ज्या वेळेस हे सत्यात उतरत आहे त्यावेळेस लोकांना कळून चुकला आहे की खरं कोण आणि खोटे कोण हे जनतेच्या लक्षात आले आहे.यावेळी आष्टी,पाटोदा ,शिरूर, मतदार संघातील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर या बैठकीचे नियोजन असताना सभेत झाल्याचे चित्र कार्यकर्त्यांच्या उत्साहपूर्ण उपस्थित वातावरणातून दिसत होते.

# चौसाळ्याची जनता वार्यावर, सरपंच फिरतात बीडमध्ये तोर्यावर ?

## चौसाळ्याच्या नागरिकांना भर पावसात प्यायला पाणी मिळेना ?

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा शहर म्हणजे बीड जिल्हयाच्या सिमा रेषेलगतचे मोठे गाव,औरंगाबाद सोलापूर महामार्गावरील बीड जिल्ह्यातील शेवटचे गाव. या चौसाळा शहरात आठवडी बाजार भरतो ,या ठिकाणी असणारी नागरिकांची लोकसंख्या सुध्दा मोठी आहे. लोकसंख्या मोठी,तशी ईथली ग्रामपंचायत सुध्दा मोठीच.पण विद्यामान सरपंच महोदया मुळे सध्या चौसाळा ही ग्रामपंचायत वार्यावर तर ,सरपंच महोदय बीड मध्ये फिरतात तोर्यावर अशी अवस्था सध्या या ठिकाणी बघायला मिळत आहे.सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने आपल्या मराठवाडा भागात उशिराने का होईना वरुणराजा बरसला असला तरीही मात्र ,मुबलक पाणी असुन सुध्दा सध्या चौसाळा ग्रामपंचायतचे नागरिक तहानेने व्याकूळ झालेले बघायला मिळत आहेत. कारण चौसाळा ग्रामपंचायत या नागरिकांना प्राथमिक अत्यावश्यक गरज असणारे पाणी वेळेवर पुरवठा करण्यात येत नाही असा आरोप सध्या या भागातील नागरिक करत आहेत.आणी या ग्रामपंचायतचे सरपंच महोदय मात्र आपल्या नागरिकांना वार्यावर सोडून बीड मध्ये राहतात त्यामुळे त्यांना आमचं काही सोयरं सुतक नाही असा आरोप या ठिकाणचे नागरिक आता करु लागले आहेत. हा झाला जिवनावश्यक असणाऱ्या पाण्याचा प्रश्न, परंतु या ग्रामपंचायतीचा कारभार सदैव भोंगळ असलेला बघायला मिळतो.चौसाळा शहरात घाणीचे साम्राज्य सतत बघायला मिळते, जागोजागी कचरा,कचर्यांचे ढिगारे च्या ढिगारे साचल्यामुळे या ढिंगावर उंदीर, घुशी,कुत्री थैमान घालतांना दिसुन येतात. बारमाही नांदणार्या घाणीमुळे येथील नागरिकांना सतत विविध आजारांच्या विळख्यात रहावे लागते. चौसाळा शहरात घणकचरा व्यवस्थापनाचे काम कधी होणार असा प्रश्नही येथिल नागरिकांना पडला आहे. चौसाळा शहरात दर बुधवारी आठवडी बाजार भरतो आणी या बाजारात आसपासची जवळपास पन्नास गावचे नागरिक येतात. मात्र आठवडी बाजार भरत असला तरी या ठिकाणी कुठल्याच व्यवस्था चौसाळा ग्रामपंचायतने केलेल्या दिसुन येत नाहीत. आठवडी बाजारात आलेल्या नागरिकांचे बेहाल होतांना येथे दिसुन येतात. एकंदरीत पाहता चौसाळा ग्रामपंचायत म्हणजे असुन अडचण आणी नसुन खोंळबा अशी गत झाली आहे.कुठल्याही ग्रामपंचायती मध्ये ग्रामसभा होणे अत्यावश्यक असते. या ग्रामसभेत आपल्या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत विकासाचा किंवा भविष्यातील योजनांचा आढावा घेऊन व नागरिकांच्या समस्या ऐकुन घेऊन त्यावर उपाययोजना केल्या जातात. मात्र चौसाळा ग्रामपंचायती मध्ये दस्तुरखुद्द सरपंच महोदयच वेळेवर हजर नसतात ते राहतात बीडला,त्यामुळे या ग्रामपंचायतीच्या समस्या त्यांना कशा माहिती असणार?ते फक्त बीडमध्ये बसुन योजना मंजूर करुन घेतात आणी कागदोपत्री विकासाची गंगा वाहत असल्याचे दाखवुन देतात असा आरोप सध्या चौसाळा परिसरातील नागरिक विद्यमान सरपंच महोदयांवर करत आहेत. चौसाळ्याचे सरपंच म्हणजे बीडमध्ये उटांवर बसुन ....चौसाळ्याच्या विकासाच्या शेळया हाकतात अशी खरमरीत टिका विद्यमान सरपंचावर चौसाळा परिसरात ऐकायला मिळत आहे.



# शेख मंजूर कामखेडा सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील जवळा हायस्कूल जवळा येथे कर्तव्यरत असलेले कारकून शेख मंजूर यांची कामखेडा सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली आहे. शेख मंजूर हे शाळेत कर्तव्य बजावतानाच अनेक सामाजिक कार्यक्रम राबवतात. आजही त्यांनी आपल्या गावाशी असलेली नाळ तुटू दिलेली नाही. यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची कामखेडा सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली आहे. या निमित्ताने त्यांचा हृदयी सत्कार करण्यात आला. यावेळी आमीर पटेल सरपंच कामखेडा, बाबुभाई, निजाम सर, शिंदे सर, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि साप्ताहिक द स्कूल एक्सप्रेस चे मुख्य संपादक शेख एजाज़ यांची प्रमुख उपस्थिती होती.

# बाळासाहेब पवार यांचे निधन

बीड - पेठ बीड भागातील सामाजिक, राजकीय क्षेत्रात योगदान असणारे बाळासाहेब प्रभु (आबा पवार ) यांचे दुःखद निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ३७ वर्षे होते.



त्यांच्यावर छत्रपती संभाजी नगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, वहीणी, दोन मुले, असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पेठ बीड भागात हळहळ व्यक्त केली जात आहे.उद्या त्यांच्या पार्थीवदेहावर अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. पवार कुटूबींयाच्या दुःखात दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवार सहभागी आहे.




# भ्रष्टाचार विरोधी जनअक्रोश संघटना माजलगाव तालुका अध्यक्ष पदी सचिन पाडमुख यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

भ्रष्टाचार विरोधी जनअक्रोश संघटना,महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब कांबळे यांच्या आदेशाने बीड जिल्हाध्यक्ष अँड अमोल डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली माजलगाव तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी माजलगाव तालुका अध्यक्ष पदी सर्वानुमते युवा नेते सचिन पाडमुख यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीने सचिन पाडमुख यांचे सर्वत्र आभिनंद होत आहे.

माजलगाव शहरातील गेस्ट हाऊस येथे दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी भ्रष्टाचार विरोधी जनआक्रोश महाराष्ट्र राज्य संघटनेची माजलगाव तालुका कार्यकारणी बैठक झाली असता या बैठकीत सर्वानुमते सचिन पाडमुख यांची निवड करण्यात आली. या संदर्भाने त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. तसेच माजलगाव शहराध्यक्षपदी शरद उजगरे, तालुका उपाध्यक्षपदी रामप्रसाद टाकखणार,

धम्मानंद भालेकर तर सचिव पदी राहुल सिरसट ,संघटक लखन नवगिरे,वैभव जावळे,शत्रुघ्न कसबे,शिलाताई तीनबोट यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त पदाधिका-यांचे सर्व स्तरातून आभिनंदन होत आहे.

# महेबुब नगर मध्ये घाण पाण्यात व बोगस नाल्या वर बेशरम चे झाडे लावा आंदोलन करणार

## महाराष्ट्र मुस्लिम युवक प्रतिष्ठाण

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील दालमिल ते बुखारी शाळा पर्यंत रस्त्याचा काम चालू असून संबंधित अधिकारी व मुख्याधिकारी यांची दुर्लक्ष करित आहे त्या संदर्भात उपविभागीय अधिकारी यांच्या कडे मागणी केली असून भोंगळ कारभार सुरू असून तात्काळ चौकशी समिती मार्फत संपुर्ण नगर परिषद मार्फत चालू कामे होत आहेत त्या कामाची चौकशी करण्यात यावी.

बाबासाहेब आंबेडकर चौक ते नुर चौक पर्यंत नाल्या चे कामे निकृष्ट दर्जाचे सेंमीट वापर करून नाल्या होता आहे त्यामुळे तडे काही ठिकाणी गेले असून ती परत पाडुन नवीन करणे. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नुर चौक पर्यंत नाल्या मध्ये गंज (इंस्टील) चा कमी वापर होत आहे त्याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असून त्याची चौकशी करण्यात यावी. नगरपरिषद कार्यालय मध्ये अनेक



तक्रार,अर्ज, निवेदन, वेळेत निकाली काढण्यात येत नसून संबंधित अधिकारी वर दप्तर दिरंगाई कायदा अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई अंमलबजावणी करणे,

बाबासाहेब आंबेडकर चौक ते नुर चौक ते बुखारी शाळा पर्यंत, जम जम कॉलेनी व शहरातील रस्ते नाल्या संबंधित गुत्तेदार यांनी दुसऱ्या गुत्तेदार यांच्या मार्फत सगमत करुन बोगस कामे करित आहे गुत्तेदार टेंडर रद्द करुण चौकशी करण्यात यावी. महेबुब नगर मध्ये नाल्या रस्ते तात्काळ काम चालू करा. माजलगाव शहरातील बाबासाहेब आंबेडकर चौक ते नुर चौक पर्यंत नाल्या चे कामे अंदाज पत्रक प्रमाणे करित नाही तसेच मानमानी कारभार सुरू असून संबंधित गुत्तेदार यांनी दुसऱ्या गुत्तेदार मार्फत कामे करुण घेत आहे तसेच नगरपरिषद कार्यालय मध्ये तक्रार, अर्ज, निवेदन वेळेत निकाली काढण्यात येत नाही मुख्याधिकारी यांच्या वर दप्तर दिरंगाई कायदा अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई अंमलबजावणी करुण योग्य कारवाई करावी नसता लोकशाही मार्गाने महेबुब नगर मध्ये दि,०४/१०/२०२४ रोजी महेबुब नगर मध्ये व ठिकाणी बोगस नाल्या करण्यात आले त्यावर लोकशाही मार्गाने बेशरम चे झाडे लावा निषेध आंदोलन करण्यात येईल अशी मागणी उपविभागीय अधिकारी यांच्या कडे करण्यात आली आहे.

# ४५ गावातील गायरान धारकांना दिलासा ;९० दिवसात अतिक्रमणे नियमित करण्याचे उच्च न्यायालयाचे जिल्हाधिकाऱ्याना आदेश!

## यशवंत खंडागळे याच्या पाठपुराव्याला यश

आष्टी । प्रतिनिधी


गेल्या ३० वर्षांपासून वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून भूमिहीन,भटक्या समाजातील लोकांनी गावासह परिसरातील शासकीय गायरान जमीनी अतिक्रमणीत करून कसत आहेत.वर्षानुवर्षी शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने यशवंत खंडागळे याच्या सततच्या पाठपुराव्याने ४५ गावातील गायरान जमीन धारकांना दिलासा मिळाला असून ९० दिवसांत अतिक्रमणे नियमित करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याना दिले आहेत. आष्टी तालुक्यातील अनुसूचित जाती, जमाती,भटके,विमुक्त, भूमिहीन कुटूंबातील अतिक्रमण धारक १९९० पुर्वी पासून गायरान जमीनी कसत आहेत. यासंदर्भात २८ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयातील तरतुदीचा आधार घेऊन व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी याच्या अभिप्रायामध्ये वरिल गायरान जमीनी या १९९० पुर्वी पासून असल्याचा उल्लेख आहे.हे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर उच्च न्यायालयाने आष्टी तालुक्यातील अतिक्रमण धारकांची अतिक्रमणे ९० दिवसांत नियमित करा.असा आदेश २० सप्टेंबर रोजी रिट याचिका क्रमांक ८५६५ड२०२४ पारित केला. असून उच्च न्यायालयाने बीड जिल्हाधिकारी यांना ९० दिवसात अतिक्रमणे नियमित करण्याचे आदेश दिले आहेत.

मागील ३० वर्षांपासून मी विविध आंदोलनाच्या माध्यमातून गायरान जमीन धारकांच्या हक्कासाठी लढत असून माजीमंत्री सुरेश धस याच्या मार्गदर्शनाखाली शासन दरबारी पाठपुरावा करत आहे.आता या लढ्याला यश मिळणार असल्याने शेकडो गायरान जमीन धारकांना याचा लाभ होणार असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल

# आ. प्रकाश सोळंके व भावी आमदार जयसिंह सोळुंके यांना पुसरा फाटा ते तीगाव चिंचाळा रस्ता व पुलाचा प्रश्न सोडविता येईना!



**प्रकाश दादा जयसिंग भैया पुसरा गावच्या नदीवरचा पूल आणि रस्ता एखादा अपघातात जीव गेल्यानंतर दखल घेणार का!**
**पुसरा तीगाव चिंचाळा परिसरातील अनेक गावांमध्ये मतापुरता वापर करून घेण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचा केविलवाना प्रयत्न!**
**पुसरा फाटा ते पुसरा तीगाव चिंचाळाला जोडणारा नदीवरील पुलाचा गेल्या पाच वर्षापासून दिलेला शब्द आमदार प्रकाश सोळंकेने पाळला का!**
**आमदार प्रकाश सोळंकेनी पुसरा तिगाव चिंचाळा गावाचा रस्ता नदीवरील पुल करू आता २०२४ विधानसभेमध्ये मतांचा एकगठ्ठा द्या मी रस्तापूल मंजूर करतोअसा शब्द देतो अशी चर्चा पुसरा गाव परिसरात!**
**पुसरा फाटा ते तीगाव चिंचाळा रस्त्याची दूर अवस्था आमदाराला दिसतेय का नाही.?**



वडवणी । अमोल मुजमुले

माजलगाव मतदार संघामध्ये कोट्यावधी रुपयाचा निधी हा फक्त कागदावरच आला आहे का असा प्रश्न आता जनता आमदार प्रकाश सोळंकेना विचारत आहे माजलगाव मतदारसंघांमध्ये अनेक गावातील रस्त्यांचे काम बोगस झालेले आहेत. यामध्ये गुत्तेदार पोसण्याचं काम आ. प्रकाश सोळंकेंकडून झालेला आहे. परंतु आजच्या घडीला पाहिले गेले तर आ. प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिह सोळके हे सुद्धा जिल्हा परिषदेचे सभापती होते. त्यांच्या कार्यकाळामध्ये सुद्धा पुसरा गावच्या विकासासाठी निधी आला परंतु त्या ठिकाणी अनेक कार्यकर्ते त्यांनी स्वतःच्या पक्षाचे न कार्यकर्ते पोसण्याचे काम केलं परंतु पुसरा फाटा ते पुसरा गावापर्यंत चा रस्ता व पुसरा गावच्या नदीवरील पूल हा आ. प्रकाश सोळंके सह अनेक माजलगाव मतदार संघातील वेगवेगळ्या पक्षाच्या नेत्यांनी आश्वासन देऊन त्या ठिकाणी फोटोसेशन केले फोटो काढून निघून गेले व पुसरा फाटा ते तीगाव चिंचाळा हा रस्ता आज सुद्धा अपघाताला निमंत्रण देत आहे. एखांदा जीव जर गेला तर त्या ठिकाणी त्याला कोण जबाबदार राहील असा प्रश्न पडत आहे. तर यावेळी आमदार प्रकाश सोळंके जयसिंह सोळंके रमेश आडसकर मोहन जगताप यांनी पुसरा गावच्या फक्त मंतापुरताचं वापर करायचा का असा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चा रंगू लागल्या आहेत. यावेळी मात्र आता पुसरा गावची नदी आणि तीगाव चिंचाळा रस्ता हा नेमका अपघातामध्ये बळी गेल्यानंतर जिम्मेदारी आमदार प्रकाश सोळंके जयसिंग सोळंके रमेश आडसकर मोहन जगताप हे फक्त मातापुरता वापर करतील का एखाद्या व्यक्तीचा जर जीव गेला तर त्या ठिकाणी ते जिम्मेदारी स्वीकारतील का गुत्तेदार एखाद्याच्या जीव गेल्यानंतर स्वतः जिम्मेदारी स्वीकारेल असाही प्रश्न यावेळी मतदारसंघातील जनतेला पडलेला आहे!

वडवणी तालुक्यातील पुसरा तिगाव चिंचाळा हा गावचा रस्ता गेल्या काही वर्षापासून पूर्ण खराब झालेला आहे पण पुसरा तिगाव चिंचाळा या गावचा रस्ता मंजूर झालेला असताना देखील गुत्तेदार या रस्त्याकडे लक्ष देत नाही पण लोकांच्या मनामध्ये एक भीती वाटते आहे की हा गुत्तेदार एखादा जीव जाण्याची वाट तर पाहात नसेल तरी पण लोकांना आपला जीव धोक्या मध्ये टाकून या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो परंतु रस्त्यावरून प्रवास करताना कदाचित एखाद्याचा जीव जर गेला तर याला जबाबदार गुत्तेदारच असेल?

# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या मातृसंस्थेच्या धम्मकार्यात चंद्रबोधी पाटील यांनी ढवळाढवळ करू नये

## डॉ. भीमराव आंबेडकर यांचा निर्वाणीचा सल्ला

मुंबई । प्रतिनिधी

आद. महाउपासिका मिराताई आंबेडकर आणि आद. डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांना संस्थेतून बडतर्फ केल्याचे पत्रक काढून अवमान करणाऱ्या स्वयंघोषित अध्यक्ष आयु. चंद्रबोधी पाटील यांनी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या मातृसंस्थेच्या कार्यात ढवळाढवळ करू नये असा निर्वाणीचा सल्ला भा. बौ. महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव य. आंबेडकर यांनी दिला आहे. मनमानी कारभार करून, मी म्हणेन ती पूर्वदिशा अशा थाटात वागणारे आयु. चंद्रबोधी पाटील यांनी नेहमीच वाद निर्माण करण्याचे काम केले आहे. यासंदर्भात त्यांनी म्हणजे आयु. चंद्रबोधी पाटील यांचे दिनांक १८ ऑगस्ट २०२४ चे पत्र क्रमांक १२१/२४, जे सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, ११ सप्टेंबर २०२४ रोजी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या मुंबई सेंट्रल ऑफिसच्या बैठकीनुसार १० मुद्यांना बिंदुवर यांचे उत्तर देण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहे. (१) हैदराबाद सभेची ३१ जानेवारी २०२४ ही तारीख चुकीची आहे. वास्तविक तारीख ३१ मे २०२२ आहे. या बैठकीत विश्वस्त अध्यक्षांचा कार्यकाळ ५ वर्षांचा करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. यावेळी अधिकारी उपस्थित होते. तुम्ही त्यांना उघडपणे विचारू शकता. खालील सह्याही होत्या. कार्यकाळासाठी मंजूर केलेला ठराव जाणीवपूर्वक छापण्यात आला आहे. मिनिट बुक - त्यांनी स्वत:जवळ ठेवले आहे. कार्यवृत्त पुस्तकावर विश्वस्त अध्यक्ष आणि विश्वस्त/राष्ट्रीय कार्याध्यक्ष यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. त्यांचा कारभार मनमानी आहे (२) विश्वस्त अध्यक्ष आणि

राष्ट्रीय अध्यक्ष हे एकच पद. आयु चंद्रबोधी पाटील हे स्वतः दी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे सर्वे सर्वा सारखे वागत असून मक्तेदारीने काम करत आहेत. त्यांनी एकत्रीकरणा कडे दुर्लक्ष केल. आणि म्हणून आयु. चंद्रबोधी पाटील यांना काढून टाकले. त्यामुळे आयु चंद्रबोधी पाटील यांना वरून काढण्याचा किंवा इतर कोणाची नियुक्ती करण्याचा कायदेशीर अधिकार

नाही. (३) आयु. डॉ. हरीश रवालिया यांनी आयु चंद्रबोधी पाटील व इतर विश्वस्त राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे नेतृत्व स्वीकारून संस्थेच्या व्यवस्थापन समितीला पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. आयु चंद्रबोधी पाटील खोटे बोलत आहेत कारण ते नुकतेच वेगळे झाले आहेत. (४) विश्वस्त अध्यक्ष डॉ. हरीश रवालिया. यांना विश्वस्त बैठक बोलावण्याची कोणतीही विनंती प्राप्त झाली बहुजनांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दिल्लीत डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांच्या उपस्थितीत मोठा कार्यक्रम होणार होता. मग त्यांची अनुपस्थिती माहीत असूनही आणि विश्वस्त अध्यक्ष आयु. डॉ. हरीश रावलिया यांच्या परवानगी शिवाय बैठक कशी आयोजित करण्यात आली ? त्यानंतर डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर, डॉ. हरीश रावलिया आणि अधिवक्ता सुभाष जोंजाळे युनिट एक झाले आणि



संघटनेच्या दिनांक १४ डिसेंबर २०२३ च्या बैठकी नुसार आयु. चंद्रबोधी पाटील - यांची विश्वस्त पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्याच्या बदल अहवाल अ्धउउ/६२६३/२०२३ म्हणून धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना सादर करण्यात आला आहे. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरजी यांचे सून आणि सूर्यपुत्र यशवंतराव आंबेडकर यांच्या पत्नी यांनी आपल्या आयुष्याचे ४५ वर्षे दी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवून संपूर्ण देशात बौद्ध धर्माचा प्रचार-प्रसार केला आणि संघटनेला २५ राज्यांत नेले. आणि महत्त्वाचे स्थान मिळवून दिले अशा या महान व्यक्तिमत्वाला आदरणीय संरक्षक पदावरून हटवून पहात असून आणि ज्यांच्या नेतृत्वाखाली दी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया म्हणजेच भारतीय बौद्ध महासभा वायुगतीने पुढे जात आहे. बौद्ध धम्माचा प्रचार- प्रसार करून ही संघटना देश-विदेशात पोहोचत आहे, असे बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू सन्माननीय डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनीही व्हायरल करून राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. सोशल मीडिया साहजिकच देशभरातील कामगारांनी संताप व्यक्त केला आहे. त्याचे माहितीचे वय. चंद्रबोधी पाटील यांना दिले. आम्ही कोणतीही धमकी दिलेली नाही. धमक्यांची गरज नाही. संस्थेच्या विश्वस्तांबाबतचा कायदा ही कागदोपत्री लढाई आहे. जो हम तो लगेंगे (१०) डॉ. हरीश रवालिया (विश्वस्त अध्यक्ष) यांच्या पत्रव्यवहारात काय लिहिले आहे ? त्याचा तपशील का दिला नाही ? डॉ. हरीश रवालिया यांना विश्वस्त अध्यक्षपदावरून हटवण्याचा निर्णय केवळ वयाच्या आधारावर घेण्यात आला. ते चंद्रबोधी पाटील यांचे आहे. जे नियमानुसार नाही. आणि मीटिंग कॉल करण्याचा कोणताही अधिकार वय आहे. चंद्रबोधी पाटील यांच्याकडे नाही. (११) ०५ ऑगस्ट २०२४ रोजी पत्र क्रमांक ७३ द्वारे अपील करूनही. आयु चंद्रबोधी पाटील यांनी धम्मकार्याची कोणतीही माहिती दिली नाही. (१२) आता डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर. हरीश रवालिया यांनी डॉ. अधिवक्ता सुभाष जोंजाळे. युनिट एकत्र केले आहे. त्यात आयु. चंद्रबोधी पाटील नाहीत! असा उल्लेख करण्यात आला आहे.

# कृषी विभागाच्या कापूस-सोयाबीन अनुदान योजनेतुन राज्यातील ४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३९८ कोटी रुपये अनुदान एका क्लिकवर वितरित

**मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीदरम्यान लाभाचे वितरण**
**९६ लाख खातेधारक शेतकऱ्यांना होणार लाभ, आधार व बँक खाते जुळणी पूर्ण होईल तसे उर्वरीत शेतकऱ्यांनाही लाभ मिळेल - धनंजय मुंडे**

मुंबई - राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षी भाव पडल्याने नुकसान झालेल्या राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याच्या योजनेतुन आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात करण्यात आली. याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५० हजार हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर च्या मर्यादेत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर २३९८ कोटी ९३ लक्ष रुपये रक्कम वर्ग करण्यात आली.

२०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ खातेदार शेतकरी हे सोयाबीन व कापूस उत्पादक होते. त्यानुसार त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लक्ष रुपये कापूस तर सोयाबीन साठी २६४६ कोटी ३४ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.




अनुदान स्वतंत्ररीत्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटी द्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. त्यावर शेतकऱ्यांची स्वत:चे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करून ती माहिती जुळणे आवश्यक असल्याने यामध्ये काही कालावधी लागला. आज जवळपास ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना आपण याद्वारे लाभ दिला आहे. आधार व अन्य माहितीची जसजशी जुळणी होत राहील तसं तसे उर्वरित शेतकऱ्यांना देखील या योजनेचा लाभ दिला जाईल अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

# गोरगरीब दिन दलितांची माय स्व केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील राजुरी नवगण येथील सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ नाना नावाजलेले पैलवान सर्वसामान्यांच्या हक्कासाठी काम करणारा रांगडा गडी यांच्याशी काकूंचा विवाह झाला जसा पंढरीचा पांडुरंग सोलापूर जिल्ह्यात आला तसाच कर्नाटक राज्यातील कानडीचा पांडुरंग बीड जिल्ह्यात आला कर्नाटक विजापूर ते राजुरी नवगण असा काकूंचा थक्क करणारा प्रवास सुरू झाला अन् राजुरी नवगणच्या सरपंच ते बीड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार थेट संसद भवन दिल्ली असा थक्क करणारा काकूंचा संघर्षमय प्रवास नक्कीच प्रेरणादायी आहे. सामाजिक काम करता करता काकूंनी राजकीय क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला बीड जिल्हा तसा दुष्काळी जिल्हा काकूंच्या घरची परिस्थिती तशी बेताचीच पण् आपल्या सोबत माझ्या भागातील माझ्या गावातील माझ्या बीड जिल्ह्यातील शेतकरी कष्टकरी कामगार शेतमजूर महिला तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी काकूंनी आपलं आयुष्य खर्ची केलं रजाकाळाच्या कालखंडात बीड जिल्ह्यातील सर्व सामान्यांच्या हक्कासाठी काम करणं तेवढं सोपं मुळीच नव्हतं. सुरवातीला काकूंनी महिला मंडळ स्थापन करून महिलांना संघटित केलं महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पुढे महिला मंडळाच्या माध्यमातून काकूंनी आपलं काम उभा केल अन् राजुरी नवगणच्या सरपंच पदाच्या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. पुढे आपल्या कामाच्या जोरावर काकूंनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक वाडी वस्तीवर आपलं संघटन उभा केले. अन् बीड लोकसभा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्यानंतर काकूंनी राजकारण कमी अन् समाजकारण जास्त केले बीड जिल्हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा दुष्काळी जिल्ह्या. या जिल्ह्यातील शेतकरी कष्टकरी कामगार शेतमजूर यांच्या मुलांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून काकूंनी आदर्श शिक्षण



संस्थेची स्थापना केली प्रचंड इच्छाशक्ती सामर्थ्य आत्मविश्वास बाळगून काकूंनी कठीण कालखंडात गोरगरीब सर्वसामान्यांच्या शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी काम केले. सावित्रीबाई फुलेंनी पुणे येथील भिडे वाड्यात महिलांना संघटित करून पहिली मुलीची शाळा सुरू केली तोच आधार घेऊन काकूंनी सर्व सामान्य महिलांना मुलांना मुलींना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरू केल्या. शिक्षणाचे महत्त्व काकूंनी काकूंनी ओळखले होते. जोपर्यंत शिक्षण शेळीच्या दुधाप्रमाणे सहज मिळणार नाही तोपर्यंत गरीबांची पोरं गुरगुर करणार नाहीत असं डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले तोच आधार घेऊन काकूंनी खेड्यातील मुलांना शिक्षणाची सोय केली गरीबांच्या झोपडीत असणारा अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी काकूंनी ज्ञानाची गंगा या दुष्काळी बीड जिल्ह्याच्या खेड्यापाड्यात नेऊन ठेवली. आदर्श शिक्षण संस्था, नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण,अनंत कृषी प्रतिष्ठान अशा अनेक शिक्षण संस्था काकूंनी स्थापन केल्या. काकूंनी लावलेल्या या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे,

ऊसतोड मजुरांचा जिल्हा असणाऱ्या या जिल्ह्यात काकूंनी गजानन सहकारी साखर कारखाना सुरू करून शेतकऱ्यांना उसबगायतदार केले. बीड जिल्ह्यातील अनेक भागात तालुक्यातील अनेक ठिकाणी तलावांची निर्मिती करून डोंगराळ माळरानावर हरितक्रांती केली.बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी सहकाराची गंगा काकूंनी बीड जिल्ह्यात आणली व लोकांचा कायापालट केला. आधुनिक हरितक्रांतीचे भगीरथ शिक्षणाची गंगोत्री म्हणून स्वर्गीय काकूंकडे आज पाहिले जाते.

काकूंना माणसं ओळखण्याची पारख होती.गावातील कार्यकर्ता म्हणजे काकूंचा जीव की प्राण होता. काकूंच्या विचारांसोबत जोडला गेलेला कार्यकर्ता शेवटपर्यंत काकूंचा इमानदार सेनापती म्हणून राहत होता. माणसं जोडण्याची कला काकूंना लाभलेली होती.काकूंचा कार्यकर्ता आमिषाला बळी पडत नव्हता. असं जुनी जाणती माणसं आजही सांगतात.काकूंचा निष्ठावंत कार्यकर्ता ही काकूंची मोठी ताकत होती.

तोच काकूंचा सामाजिक राजकीय शैक्षणिक कामाचा वसा अन् वारसा लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर पुढे घेऊन जात आहेत. आज ४ ऑक्टोंबर काकूंची पुण्यतिथी आज पुण्यतिथीच्या निमित्ताने उद्याच्या विधानसभा निवडणुकीत लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प आपण करूया अन् काकूंना पुण्यतिथीच्या निमित्ताने अभिवादन करु. अण्णांचा मोठ्या मताधिक्याने विजय हेच काकूंना पुण्यतिथीच्या निमित्ताने अभिवादन असेल शेतकरी कष्टकरी कामगार शेतमजूर यांची माय स्व काकूंना माझ्या बहिर परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन! भारत दामोधर बहिर सहशिक्षक जिल्हा परिषद अहमदनगर ९८२२९०८६०३

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT